दिनांक 28/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 266

विषय – चिटा नगरपरिषदेसाठी माझी वसुंधरा अंतर्गत शहरातील बगिचामध्ये Coin Operated Solar powered mobile charging station बसविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 28/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहराने मागील 6-7 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त केला होता. स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये विटा नगरपरिषदेचा संपूर्ण देशामध्ये 7 वा क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धेमध्ये पश्चिम विभागात 3 रा क्रमांक प्राप्त केला आहे.

विटा नगरपरिषदेच्या बगिचामध्ये नागरीकांच्या सोईसाठी व माझी वसुंधरा अभियानात शहराचे मानांकन उंचावण्यासाठी Coin Operated Solar powered mobile charging station बसविणे योग्य वाटते. तसेच यामुळे नगरपरिषदेच्या उत्पन्नामध्ये भर पडणार आहे. शहरातील बगिचामध्ये Solar powered mobile charging station बसविलेमुळे स्वच्छ सर्वेक्षण 2024 व माझी वसुंधरा अभियानामध्ये याचा फायदा होईल.

तरी विटा नगरपरिषदेसाठी माझी वसुंधरा अंतर्गत शहरातील बगिचामध्ये Coin Operated Solar powered mobile charging station बसविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा